# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

## सर्वसाधारण सभा क्रमांक २२, दिनांक २७/०३/२०१७

विषय क्रमांक : १९ (आयत्यावेळचा विषय क्र.१/३) ठराव क्रमांक : १६३

प्रशासनाकडील जा.क्र.कडोंमपा/ शअ/ ७१२, दि.२७/०३/२०१७ अन्वये प्रस्तावीत केल्यानुसार कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येणाऱ्या स्मार्ट सिटी योजने अंतर्गत विविध विकास प्रकल्प हाती घेणेसाठी देशातंर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील विदेशी संस्थांकडून तांत्रिक व आर्थिक सहकार्य घेणेबाबतचा विषय आजचे सभेत सर्वानुमते आयत्यावेळचा विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आला आहे. प्रशासनाने उपरोक्त गोषवाऱ्यान्वये प्रस्तावीत केल्यानुसार, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून निवड करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत निर्माण केलेल्या विशेष उद्देश वाहन (एस.पी.व्ही) व कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे विविध प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. सद्यस्थितीत महापालिका क्षेत्रात विकास योजनेमध्ये अंतर्भूत असलेले व भविष्यात हाती घ्यावायाच्या सोयी सुविधा उपलब्ध करण्यासाठी उदा. भविष्यात नियोजित असलेल्या मेट्रो स्टेशनसाठी जागा, आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम, शिव आरमार स्मारक, माहिती व तंत्रज्ञान क्षेत्र व त्या अनुषंगिक आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करणे शहरातील अस्तित्वातील रस्त्यांचे रूंदीकरण व वाहतुक योग्य आखणी करणे, तलाव विकसीत करणे, शहरात अद्ययावत मनोरंजन केंद्र व बागा उभारणे तसेच विकसनशील क्षेत्रात नगररचना परियोजना राबवून आंतरराष्ट्रीय दर्जाचे नविन शहर उभारणे इ. प्रकल्प स्मार्ट सिटी बनविण्याच्या उद्देशाने राबविणे आवश्यक आहे. महापालिकेकडील स्त्रोताचा विचार करता महापालिकेला तांत्रिक स्तरावर व आर्थिक स्तरावर सक्षम अशा देशी किंवा विदेशी संस्थेची मदत घेणे आवश्यक आहे.

देशातील निवडण्यात आलेल्या स्मार्ट सिटी शहरांच्या विकासासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर सहकार्य मिळविण्याच्या दृष्टीने भारत सरकार व कोरियन गव्हर्नमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष भागिदारी नितीची घोषणा करण्यात आली आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने कोरीयन सरकारच्या 'कोरीया लॅड अ‍ॅड हाऊसिंग कॉर्पोरेशन'शी सामंज्यस्य करार केलेला आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेलापण स्मार्ट सिटी योजना राबविणेसाठी तसेच शहरातील विविध विकास कामे करण्यासाठी अशाच आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्थेकडून सहकार्य मिळविणे मदतीचे होणार आहे. कोरीया लॅड अ‍ॅड हाऊसिंग कॉर्पोरिशच्या पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्रातील निवडण्यात आलेल्या स्मार्ट शहरातून कल्याण डोबिवली महानगरपालिकेच्या प्रस्तावात स्वारस्य दाखवून शहराची पाहणी केली आहे. त्यांच्याकडून भविष्यात सहकार्य मिळविण्यासाठी सामंजस्य करार करणे आवश्यक आहे.

तरी उक्त नमुद बाबींचा विचार करता महापालिका क्षेत्रातील मोठया प्रमाणावरील विकास कामे हाती घेणेसाठी अद्यायावत स्वरूपाचे तांत्रिक सहाय्य व आर्थिक मदत मिळविणेसाठी Korea Land and Housing Corporation of the Republic of Korea या संस्थेबरोबर सामंजस्य करार करणेस आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील विकास कामांना तांत्रिक अथवा आर्थिक सहाय्यता देणाऱ्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थेशी सामंजस्य करार करणेसाठी आयुक्तांना प्राधिकृत करणेस ही सर्वसाधारण सभा या ठरावाद्वारे मंजूरी देत आहे.

सूचक :– राजेश गोवर्धन मोरे
सभागृह नेता

अनुमोदक :– प्रकाश गोपीनाथ भोईर
विरोधीपक्ष नेते

सर्वानुमते ठराव मंजूर.

महापौर व पीठासीन अधिकारी,
सर्वसाधारण सभा,